Impact Factor – 6.261 Special Issue - 109 Feb. 2019 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Journal

Multidisciplinary International E-research Journal

Two Days Interdisciplinary International Conference on

# Role of Social Reformers in Nation Building

Organized by

Pankaj Shaikshanik and Samajik Sanstha's

**Pankaj Kala Mahavidyalaya, Chopda**

( 'B' Grade NAAC Accredited )

Sponsored by

**K.B.C. North Maharashtra University,**
Jalgaon



- EDITOR -

**Prin. Dr. Sambhaji N. Desai**

- CHIEF EDITOR -

**Mr. Dhanraj T. Dhangar**

For Details Visit To : www.researchjourney.net SWATIDHAN PUBLICATIONS

Printed By : PRASHANT PUBLICATIONS, JALGAON

# : CONTENTS :

1 Social Reformer : Swami Isrilaprabhupada .......... 15
- V. Venugopal (VBG DASA, Tirupati)

2 राष्ट्रभाषा हिंदी के विकास में मराठी भाषिकों का योगदान .......... 18
- प्राचार्य डॉ. नाना गायकवाड

3 महिला स्वातंत्र्य चळवळ : महिला समाजसुधारकांचे योगदान .......... 21
- प्राचार्य डॉ. प्रकाश जाधव

4 परभणी जिल्ह्यातील बी. रघुनाथ यांचे साहित्य व हैदराबाद मुक्तीसंग्राम (इ.स. १९१३ ते इ.स. १९५३) .......... 25
- डॉ. गीतांजली भीमराव बोराडे

5 समाज प्रबोधनातील दिपस्तंभ .......... 29
- प्रा.डॉ. कावळे वी.एन.

6 Role of other fields of humanities in social Reforms (Public Administration) .......... 31
- Dr. Sunil Himmatrao Patil

7 Syed Ahmed Khan & Muslim Reform In The 19th Century .......... 34
- Dr. Zoheb Hasan

8 Literature And Society .......... 36
- Dr. Anushri Mahurkar

9 सरदार रामराव गोपाळराव उर्फ बाबासोहब मिरीकर : व्यक्ती आणि कर्तृत्व .......... 40
- डॉ. अर्चना टाक

10 महात्मा जोतीराव फुले यांचे शैक्षणिक कार्य : एक अध्ययन .......... 43
- प्रा.डॉ. कदम डी.के.

11 Gandhian Perspective on Community and Education .......... 46
- Dr. Vijaykumar Tupe
- Dr. Kalpana Jamgade

12 महाराष्ट्रातील समाजसुधारकांचे राष्ट्र निर्मितीमध्ये योगदान .......... 50
- प्रा.डॉ. विलास घोडे

13 राष्ट्र उभारणीमध्ये सावित्रीबाईफुले यांचे शैक्षणिक व सामाजिक योगदान .......... 55
- डॉ. विठ्ठल भिमराव मातकर

14 साहित्य आणि समाज .......... 59
- डॉ. विठ्ठल केदारी

15 कर्मवीर भाऊराव पाटील यांचे देशाच्या जडणघडणीत योगदान .......... 61
- डॉ. काशीनाथ सोलनकर

16 Role of Mahatma Jotirao Phule in Nation Building .......... 63
- Dnyaneshwar M Bansode

17 भारतातील बालहक्क चळवळ .......... 65
- प्रा.डॉ. नंदा पांगुळ

18 WTO And Its Impact on Indian Agriculture .......... 69
- Prof. Nanwate N.N.

19 राजर्षी शाहू महाराज – एक कर्मयोगी .......... 73
- प्रा. सुनिता विठ्ठलराव भोसले

20 राजर्षी शाहू महाराज यांचे महाराष्ट्राच्या जडणघडणीतील स्थान .......... 75
- प्रा.डॉ. राजाराम प्रभाकर गावडे

# महात्मा जोतीराव फुले यांचे शैक्षणिक कार्य : एक अध्ययन

– प्रा.डॉ. कदम डी.के.
समाजशास्त्र विभाग प्रमुख, हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय,
हिमायतनगर जि.नांदेड.

**प्रस्तावना**

भारतीय समाजात विषमता निर्माण झालेली होती. थॉमस पेन यांनी इ.स.१७९१ मध्ये मानवी हक्कावरचे पुस्तक महात्मा फुले यांच्या वाचनात आले, त्या पुस्तकाचा त्यांच्या मनावर प्रभाव पडला. तेंव्हापासून भारतीय समाजातील विषमता दूर करण्यासाठी त्यांच्या मनात सामाजिक न्यायाबाबत विचार येऊ लागले. हि विषमता दूर करण्यासाठी शिक्षण हेच एकमेव हत्यार आहे असे त्यांच्या लक्षात आले. महात्मा फुलेंनी समाजसुधारणेसाठी अनेक कार्य केले. त्यातील शैक्षणिक कार्य हे अतिशय महत्त्वाचे आहे. तत्कालीन समाजव्यवस्थेचे फुले निरीक्षण करुन या समाजात ब्राम्हणेत्तर आणि घ्स्त्रीङ यावर अन्याय झाला आहे दिसून आले. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची विदारक दुर्दशा आणि दारिद्रय यांचे वास्तव दर्शन शेतकऱ्याचा आसूड या ग्रंथातून मांडले. याचे एकमेव कारण घअविद्याङ आहे. स्त्री आणि बहुजन समाजाला शिक्षण मिळाले नाही म्हणून समाजातील विषमता नष्ट करणे व तळागाळातील समाजापर्यंत शिक्षण पोहचवणे हे त्यांचे ध्येय होते. महात्मा फुले अगोदर शिक्षणाचे महत्व पटवून दिले.

*विद्येविना मती गेली ।*
*मतीविना नीती गेली ।*
*नीतीविना गती गेली ।*
*गतीविना वित्त गेले ।*
*वित्ताविना शुद्र खचले ।*
*इनकेअनर्थ एका अविद्येने केले ।।*

महात्मा जोतिबा फुले यांनी फक्त समाजाला विद्येचे महत्व पटवून दिले नाही तर त्यासाठी काय करावे हे पण त्यांनी स्पष्ट सांगितले.

*दारिद्रय मुलांनी विद्येस शिकावे ।*
*भिक्षान्न मागावे । पोटा पुरती ।*

भिक्षा मागून पोट भरावे मात्र विद्या शिकावी हा गरीब कुटूंबातील विद्यार्थ्यासाठी उपदेश केला. भिक्षा ही मागतांना त्यांनी मर्यादा घालून दिलेली दिसून येते. कारण विद्या घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी फक्त पोटाला लागेल तेवढी भिक्षा मागून शिक्षण घ्यावे असा उपदेश केला. आज आधुनिक समाजासाठी हे विचार अतिशय मोलाचे आहेत. आज समाजातील अनेक विद्यार्थी आपल्या कुटूंबावर, आई-वडीलांवर दोष ठेवून काय करावे आर्थिक परिस्थितीच चांगली नव्हती असे कारण सांगतांना दिसून येतात. आजच्या तरुणाईपुढे विचार ठेवणे अतिशय महत्वाचे आहे.

महात्मा जोतिबा फुले यांनी जसा विद्यार्थ्यांना विद्या घेण्याचा उपदेश केला त्याप्रमाणे वृध्दांनी विद्या देण्याचे म्हणजे शिक्षा शिकवण्याचे कार्य करावे असा स्पष्ट उपदेश केलेला दिसून येतो. विद्वान वृध्दांनी विद्यादान दयावे. भिक्षेकरी व्हावे गावामध्ये । समाजातील वृध्दांनी लोक आहेत त्यातील काही वृध्द हे विदवान असतात. त्यांनी समाजातील मुलांना शिक्षण देण्याचे कार्य गावात करावे. भिक्षूक होऊन पोट भरावे परंतु शिक्षण देण्याचे कार्य करावे. जो पर्यंत गावात शिक्षणाचे प्रमाण वाढणार नाही तो पर्यंत समाजाची प्रगती होणार नाही हे फुले जाणले होते. यावरुन हे स्पष्ट होते की, महात्मा फुले यांचे विचार हे दुरदृष्टीचे होते.

भारतीय समाजरचना धर्माधिष्ठीत आहे. फुलेंनी जाणून घेतले होते. धर्माधिष्ठीत समाजरचनेमुळे आरंभापासूनच स्त्री-पुरुष समानता नव्हती. अतिप्राचीन, प्राचीन, मध्ययुगीन कालखंडात देवी आदर्शमाता, भाऊक, भावना प्रधान, संकट मोचन करणारी अशी उपमा देवून तीचा समाजात फक्त गौरव केला होता. धर्मशास्त्र, धर्मशास्त्री आणि पुरुषप्रधान समाजव्यवस्थेने स्त्रीयांना दुय्यम, गौण स्थान दिले म्हणून महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणावर भर दिला होता.

स्त्री-पुरुषासाठी शाळा त्या घालाव्या । विद्या शिकवाव्या ।। भेद नाही. या पंक्तीतून त्यांनी विषमता दूर करण्यासाठी अतिशय प्रभावी विचार मांडला. शाळा स्थापन कराव्या पण त्या फक्त पुरुषासाठी किंवा स्त्रीयांसाठी नाही तर शाळा दोघांसाठी असाव्यात असा स्पष्ट विचार मांडला. ते विचार मांडूनच थांबले नाही तर स्त्रीयांसाठी शाळा काढून स्त्री शिक्षणाचे दरवाजे खुले केले. म्हणून त्यांना करते सुधारक असे म्हणतात. आज आधुनिक समाजात कुठेतरी विचार होतांना दिसून येतो की, गावात मंदिरेबांधण्यांनी गावाचा विकास होत नाही. गावाच्या विकासासाठी गावात शाळा असल्या पाहिजेत यावरुन हे स्पष्ट होते. महात्मा फुले यांचे विचार हे अतिशय दूरगामी स्वरुपाचे होते.

जगातील बहुतांश सर्वच देशात अनेक वर्षापासून स्त्रियांचा दर्जा उंचावलेला नव्हता. स्त्रीयांचा समाजातील दर्जा उंचावण्यासाठी अनेक प्रकारचे प्रयत्न झाले. त्यात समाजसुधारकांची अत्यंत महत्वाचा वाटा आहे. समाजातील लिंगभेद विरहीत व स्त्री पुरुषांना समान दर्जा देण्यासाठी व सामाजिक विषमता दूर करण्यात महात्मा फुले यांच्या विचारांचा आणि कार्याचा वाटा अतिशय महत्वाचा आहे.

ब्रिटिशाच्या स्त्री विषयी धोरणाने प्रभावीत झालेले काही शिक्षीत तरुणांनी स्त्री शिक्षणाला चालना दिली. परंतु महात्मा फुले यांनी महिला सक्षमीकरणास सुरुवात करण्यास अतिशय मोलाची कामगिरी केली असे म्हटले तर अतितशयोक्ती होणार नाही.

भारतीय समाजात स्त्रीला भोगवस्तू करण्याचा प्रयत्न पुरुषांनी

केला होता. त्यामुळेच स्त्रीला घ्चूल आणि मुलड या भूमिकेत गुंतवून ठेवण्याचा प्रयत्न झाला. तत्कालीन परिस्थितीत सुधारणेचे वारे वाहण्यास सुरुवात झाली होती. राजाराम मोहन रॉय यांनी जिवतपणी नवऱ्याबरोबर सती जाणे हा अत्यंत क्रुर प्रकार आहे त्यासाठी त्यांनी त्या विरुध्द आवाज उठवला. सतीबंदीचा कायदा करण्यासाठी त्यांनी सतत ३० वर्ष हिंदू सनातन्यांशी लढा देऊन इ.स.१८२९ मध्ये गव्हर्नर जनरल लॉर्ड वॅटिंग यांनी सती बंदीचा कायदा संमत केला. महात्मा फुले यानी तत्कालीन हिंदू सनातन्यांशी लढा दयावा लागला. कारण स्त्री ने शिक्षण घेतले म्हणजे धर्म बुडले असे विचार होते याचा परिणाम महात्मा फुलेंना भोगावा लागला. स्त्रियाच्या शिक्षणासाठीचे कार्य हाती घेतल्यामुळे त्यांना घर सोडावे लागले. परंतु बहुजन समाजाचे अज्ञान, दारिद्रय आणि समाजातील विषमता, जातीभेद पाहून त्यांनी समाजिक परिस्थिती सुधारण्याचा निश्चय केला. त्यांनी इ.स.१८४८ मध्ये पुण्यामध्ये बुधवार पेठ येथे भिडे यांच्या वाडयात मुलींची शाळा काढली. महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची ही मुहूर्तमेढ ठरली. ही शाळा महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशातील पहिलीच शाळा होती. महात्मा फुलेंनी हक्कांपासून वंचित झालेल्या स्त्री, शुद्रातीशुद्रांच्या दुर्दशेचे मुख्य कारण अविद्या हे असून ते प्रथम दूर करण्यास महत्व दिले.

शिक्षण कार्यात महात्मा फुलेंनी अपमान आणि मानहानी सहन करावी लागली. मुलींना शिकविण्यासाठी त्यांनी प्रथम सावित्रीबाईंना शिकवले. शाळेतील मुलींना शिकविण्याची जबाबदारी स्वत: पत्नीवर सोपवली. सावित्रीबाई फुले यांना सनातनी लोकांक डून खुप त्रास सहन करावा लागला. शिक्षण प्रसाराच्या कार्यासाठी त्यांना सनातनी ब्राम्हण वर्गानी त्रास दिला. परंतु त्यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेवून इस्ट इंडीया कंपनी सरकारने सन्मान केला. म्हणून त्यांना अपमान आणि मान शैक्षणिक कार्यात मिळाल्याचे दिसून येते.

सर्व शिक्षा अभियानांतर्गत मुलभूत हक्काची अंमलबजावणी होत आहे. शाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्यात आली. हे सर्व श्रेय महात्मा फुले यांना जाते. यावरुन हे स्पष्ट होते की, महात्मा फुले यांचे विचार दूरदृष्टीचे दुरगामी स्वरुपाचे होते.

मागासवर्गीय आणि बहुजन समाज हा अंधश्रध्दा, आर्थिक दारिद्रय, कर्जबाजारीपणा, सांस्कृतिक व सामाजिक गुलामगिरीत अडकलेला होता. मागासवर्गीय बहुजन समाज शिक्षण घेऊ शकत नाही. हे त्यांनी जाणले होते. बहुजनांच्या व मागासवर्गीयांच्या शिक्षणाची जबाबदारी शासनाने उचलावी, विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी प्रेरीत करण्यासाठी शिष्यवृत्या, बक्षिसे यांची व्यवस्था करावी. गरीब मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था व्हावी वसतिगृहे काढली पाहिजेत हे सरकारला ठणकावून सांगितले. आज बहुजन समाजाला शिष्यवृत्या मिळाव्यात मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय व्हावी यासाठी तालुका स्तरावर वसतिगृहाची स्थापना केली जात आहे. वसतिगृहाचे मूळ विचार महात्मा फुले यांचे आहेत.

तत्कालीन समाजात ब्रिटिश सरकारचे शिक्षणाचे धोरण हे चुकीचे आहे. सरकारने शिक्षणाचे धोरण जाणीवपूर्वक ठरविले. ब्रिटिश सरकार फक्त वरीष्ठ जातीतील लोकांना शिक्षीत करुन त्यांना प्रशासनात सामावून घेण्याचा प्रयत्न आहे. सरकारच्या धोरणात समाजातील शुद्रातीशुद्रांना शिक्षणाची संधी मिळत नाही. सरकारला शिक्षण विषयक धोरणाचा फेरविचार करण्याची मागणी केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी प्राथमिक शिक्षणाचा सार्वजनिक प्रसार सर्वांगीण राष्ट्रीय प्रगतीच्या इमारतीचा पाया आहे. केवळ लोकांच्या खुशीवर हा प्रश्न सोडवल्यास प्राथमिक शिक्षणाचा १९ व्या शतकात पाश्चात्य राष्ट्राची प्रगती झाली होती. समाजजीवनाचा आर्थिक, सामाजिक क्षेत्रात झपाटयानी प्रगती होण्याचे एकमेव मूळ कारण घशिक्षणङ आहे त्यांनी जाणले होते. भारतीय समाजाची प्रगती करावयाची असेल तर आधुनिक शिक्षणाचा सर्वदूर प्रसार झाला पाहिजे. कारण शेतकऱ्यांचे वाढते दारिद्रय धर्मभोळेपणा, धार्मिक, आर्थिक, सामाजिक क्षेत्रातील गुलामगिरीतून मुक्तता करण्यासाठी शिक्षणासारखे परिणामकारक हत्यार कोणते नाही. हे स्पष्ट सांगीतले.

सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षणाचा विचार महत्वपूर्ण होता. तत्कालीन समाजव्यवस्थेत प्रशासनात ब्राम्हण वर्गाची मक्तेदारी होती. ही ब्राम्हण वर्गाची प्रशासनातील मक्तेदारी मोडीत काढण्यासाठी त्यांनी १२ वर्षाखालील मुलां-मुलींसाठी सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण मिळण्याची व्यवस्था सरकारने करावी अशी मागणी करणारे जोतिराव फुले प्रथम भारतीय होते. सरकारने बालकांना मोफत शिक्षण देणे शासनाचे कर्तव्य आहे. प्राथमिक शिक्षण प्रभावी मिळाले तर उच्च शिक्षण घेण्याचे प्रमाण वाढले. म्हणून २६ जानेवारी १९५० रोजी स्वीकृत केलेल्या संविधानातील ४५ वे कलम हे प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात आहे. संविधान निर्माण झाल्यापासून १० वर्षात ६ ते १४ वयोगटातील मुलांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्याची बांधिलकी स्वीकारीत आहे. अशी भारतीय राज्यघटनेत तरतुद केली.

स्वातंत्र्यानंतर आजपर्यंत १४ वर्षाखालील मुलांना प्राथमिक शिक्षण देखील आपण पुरवू शकलो नाही. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या मार्गदर्शक तत्वाकडून मुलभूत हक्काक डेअसा प्रवास १९९० नंतर वेगाने झाला. भारतीय राज्यघटनेतील ४५ व्या कलमाचा पुनर्विचार करण्यात आला. ९३ वी घटना दुरूस्ती करुन त्यानुसार ६ ते १४ वयाच्या सर्व मुलांच्या प्राथमिक शिक्षण हा मुलभूत अधिकार ठरविला गेला. नविन विधेयकामुळे शिक्षणाचे सार्वजिनीकरण होऊन प्रसार होण्या कैक शतकेलागतील म्हणून शिक्षणाच्या बाबतीत सक्तीचा कायदा हवा हे स्पष्ट केले. महात्मा फुलेचा ब्रिटिश सरकारच्या शिक्षणाच्या धोरणाला विरोध करुन शिक्षणाचा कायदा करावा. ही आग्रही भूमिका असल्याचे दिसून येते.

महात्मा जोतिबा फुले यांचे शिक्षण विषयक विचार हे अतिशय चिंतनीय स्वरुपाचे होते. हंटर कमिशनला साक्ष देऊन त्यांनी भारत देशातील उच्च शिक्षणाची दैना मांडली. सरकारने ग्रामीण भागातील बहुजन मागासवर्गीय मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देण्याची मागणी केली. शिक्षण हे व्यवसायभिमुख, व्यवहार उपयोगी, नितीमत्ता यावर भर देणारे असावे. शिक्षण घेतलेल्या मुलांना नोकऱ्यांची तरतुद करावी. यावरुन हे स्पष्ट होते की आजचे सुशिक्षीत बेरोजगारीची समस्या बघितली तर डीग्री घेऊन हजार मुले फिरतांना दिसून येतात. हेच शिक्षण व्यवहार उपयोगी, व्यवसायभिमुख अशी आग्रही भूमिका

तेंव्हा मांडणारे होते म्हणून त्यांचे शिक्षण विषयक विचार किती प्रगल्भ होते हे दिसून येते. महात्मा फुले यांचा शिक्षण विषयक विचारांची आज कडक अंमलबजावणी केली. शिक्षण घेतल्याने आपला स्वतंत्र व्यवसाय चालवला असता. व्यावसायिक कौशल्य आणि व्यवहारज्ञान या दोघांचाही शिक्षणामध्ये अंतर्भाव झाला पाहिजे. परंतु आज पदवी घेतलेल्या मुलांना आडत दुकानावरील मालाची पाटीही वाचता येत नाही. ती समजत नाही. शेतीची सातबारा (७/१२) आणि होल्डींग अनेकांना समजत नाही. म्हणून त्यांनी सांगीतले होते. शिक्षण म्हणजे कोरडी ज्ञानसाधना नव्हे शिक्षणातून चारित्र्यसंपन्न माणूस घडला पाहिजे प्रगत विचारांचे संस्कारही त्यांच्यावर झाले पाहिजे असा शिक्षण विषयक दृष्टीकोन होता.

महात्मा जोतिबा फुले यांचे शिक्षण विषयक धोरण अतिशय महत्वपूर्ण होते. शिक्षण सामाजिक परिवर्तनाचे साधन आहे. शिक्षणामुळेच सामाजिक परिवर्तन होते हे जाणले होते म्हणून स्त्री-शुद्रातीशुद्रांना जाणीव जागृत करण्याचा प्रयत्न आयुष्यभर केला. स्त्री वर्गाला आणि बहुजनांना शिक्षण मिळाले नाही म्हणुन स्त्रीयांचा हीन दर्जा आणि त्यांचे अज्ञान, त्यांचे शारिरीक व मानसिक हाल होतात. म्हणूनच शिक्षण अन्यायग्रत स्त्रीयांना मिळाले तर आपल्यावर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात लढण्यासाठी संघटीत होण्याची शक्ती देऊ शकते. असा आवाज महात्मा जोतिबांनी उठविला म्हणून त्यांना स्त्री मुक्तीचा आदयप्रवर्तक असे म्हटले जाते.

महात्मा जोतिबा फुले यांचे शिक्षण सर्वांगीण विक ास करणारे आहे. शिक्षण हे खालच्या वर्गापर्यंत का पोहचू शकले नाही हेप्रथम त्यांनी जाणून घेतले. त्यांच्या लक्षात आले की, ब्रिटिश सरकारचे शिक्षण विषयक धोरणच चूकीचे होते. एज्युकेशनल फिल्टर थेअरी (शिक्षणाचा झिरपता सिध्दांत) चूकीचा आहे. लॉर्ड मेकाले यांच्या शिक्षणाच्या धोरणाला विरोध केला. तसेच वर्गाच्या ध्यानबुध्दीवर शिक्षण अवलंबून न राहता सरकारने प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे असे सरकारला ठणकावून सांगितले.

महात्मा जोतिबा फुले यांनी स्त्रीयांना शिक्षणाची दार खुली केली. शिक्षणातून जनसामान्यातील अन्याय, अत्याचार, रुढी, परंपरा, कर्जबाजारीपणा याबद्दल जागृती निर्माण केली. बहुजन, अस्पृश्य समाजातील मुलांमुर्लीसाठी शाळा, वसतिगृह काढले. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करावे. प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी ही सरकारची आहे. असा आग्रह धरला. शिक्षणातून माणसाचे व्यक्तिमत्व विकसीत होत जावून व्यक्तीला त्याच्या गुलामीची जाणीव व्हावी हाज त्यांचा शिक्षण विषयक दृष्टीकोन होता.

**संदर्भ**

१. रा.ज.लोहे - भारतीय सामाजिक विचार, पिंपळापुरे ॲन्ड कं.पब्लीशर्स, नागपूर.
२. प्रा.डॉ.किशोरकुमार गव्हाणे, प्रा.डॉ.ए.पी.शिंदे, प्रा.डॉ.जयश्री कुलकर्णी, अरुणा प्रकाशन, लातूर.
३. डॉ..आंबेडकर भिमराव - बहिष्कृत भारत आणि मूकनायक (अग्रलेख) प्रकाशन क्षितीज पब्लीकेशन, नागपूर.
4. https://mr.wikipedia.org/5/5q Jump to navigation Jump to search
५. राजनिती विज्ञान : बी.एल.फडीया, प्रतियोगीता प्रकाशन, नवी दिल्ली.